साहित्य सोनियाच्या खाणी

# 'पूर्ण आनंद गुरु समर्थ'चे दर्शन




**श्री गुरुस्तुति**

**विवेचक :** श्री. वासुदेव वामन बापटगुरुजी

**प्रकाशक :** ओम् सद्‌गुरु प्रतिष्ठान

ए/८, दौलतनगर, रस्ता क्र.७, बोरिवली (पू),

मुंबई-४०० ०६६.दूरध्वनी : ०२२-२८९३९८६३

मोबाईल : श्री. ठाकूर-९८१९४४७९३९

**पृष्ठे :** १६० **मूल्य :** रु.१७५/- ('संतकृपा' सभासदांना रु.१२०+ पोस्टेज खर्च)

आपल्या धर्मसंप्रदायांनी भारतीय संस्कृतीचे संरक्षण आणि संवर्धन केले. महानुभाव, नाथ, वारकरी, दत्त आणि समर्थ हे या भूमीतील प्रमुख संप्रदाय असून दत्त संप्रदायात अनेक आत्मानुभवी श्रेष्ठ सत्पुरुष होऊन गेले. विशुद्ध उपासना, लोकोद्धाराची तळमळ आणि आत्मसाक्षात्कार यांमुळे यातील श्रेष्ठ सज्जनांनी भाविकांना सन्मार्गाचे दर्शन घडविले. दत्तोपासकांची प्रभावळ मोठी असून त्या सर्वांच्या श्रेय नामावलीत 'श्री वासुदेवानंद सरस्वती टेंबे स्वामी' या नाममुद्रेला महत्त्वाचे स्थान आहे. श्री दत्तात्रेयांनी त्यांना प्रत्यक्ष साक्षात्कार आणि मंत्रोपदेश इ.स.१८८२ मध्ये दिला अन् अलौकिक चरित्रमाला सुरू झाली. 'श्री स्वामी महाराज (प.प. वासुदेवानंद सरस्वती) हे आपले आद्य शंकराचार्य आहेत व त्यांच्याप्रमाणेच सर्वगुणसंपन्न असून त्यांचे धर्मसंस्थापनेचे कार्य करीत आहेत' असे उद्‌गार शृंगेरी मठाधीश प.प.सच्चिदानंद शिवाभिनव नृसिंह भारती महाराजांनी शृंगेरी मठातील भेटीप्रसंगी काढले. यावरून प.पू.टेंबे स्वामींची श्रेष्ठता, अधिकार व अलौकिक प्रज्ञा यांची प्रचिती येते.

स्वामी महाराजांनी श्रीदत्तकृपेने प्रचंड अशी संस्कृत व प्राकृत ग्रंथरचना केली असून त्यात पुराणग्रंथ, भाष्य, चूर्णिका, महात्म्य ग्रंथ, चंपू, लहरीकाव्य, स्तोत्रे, अभंग, संवादात्मक रचना, कीर्तनाख्याने, दत्तषोषशोवतार कथा, नर्मदा लहरी, कृष्णा लहरी यासारखी लोकमतांवर लिहिलेली स्तोत्रे, वेदांत स्तोत्रे, साधकांना लिहून दिलेले मंत्र असा प्रचंड विस्तार आहे. प्रत्यक्ष ग्रंथातील आशय आणि त्यातील संदर्भ पाहिल्यावर या दिव्य अभिव्यक्तिच्या चमत्काराची खात्री पटते. त्यांचे लेखन कित्येक ठिकाणी गूढार्थाने भरलेले असून अल्पबुद्धीला त्याचे आकलन होण्यासारखे नाही. त्याचे कारण त्यांचे लेखन समाधिस्त प्रज्ञेतून श्रीदत्तप्रेरणेने निर्माण झाले आहे. शब्दकोशातून अर्थ पाहून लिहिणाऱ्यांना ते सहज समजणे कठीण आहे. असे असता श्री. बापट गुरुजी यांनी '(अ) घोरकष्टोद्धारण स्तोत्र' आणि त्यापाठोपाठ 'श्री गुरुस्तुति' स्तोत्रावर केलेले विवेचन गुरुजींच्या अध्यात्मिक अधिकाराची आणि गुरुकृपेतून साकारलेल्या सारस्वत गंगेची सहज प्रचिती येते.

श्री वासुदेवानंद सरस्वती यांनी संस्कृत-मराठीतून ४००हून अधिक स्तोत्रे लिहिली आहेत. त्यामध्ये दत्तभक्तिपरता, मंत्रगर्भता, भावमयता, परब्रह्मस्वरूपता, प्रापंचिक दु:खनिवारण क्षमता, वेदशास्त्रपुराणोक्तता, आशयगर्भता, मौलिकता, अर्थसौंदर्य, रचनासौष्ठव, रसात्मकता, व्याकरणशुद्धता हे अभिजात साहित्यगुण अनुभवास येतात. त्यामुळेच श्री. बापट गुरुजी यांनी 'श्री गुरुस्तुति' स्तोत्राचे केलेले विवेचन हे साहित्यिक आणि आध्यात्मिक अशा दोन्ही दृष्टींनी अतिशय मौल्यवान असेच आहे.

केवळ दहा श्लोकांचा अर्थ १४० पृष्ठांहून अधिक पानांमध्ये साक्षेपाने सांगताना त्याची लय, प्रवाह आणि अर्थ याला कुठेही धक्का न लागता जितक्या लिलया सादर केले आहे, तितकाच त्यांचा वैचारिक,

लेखनिक अधिकारही मोठा असल्याचे प्रत्ययास येते. स्वामीजींचे सारे लेखन गूढपूर्ण असताना त्यातील नेमका गूढार्थ शोधून सर्वसामान्यांना सहजपणे आकलन होईल अशा परिभाषेत सोदाहरण सादर करण्याचे मोठे कार्य श्री. बापट गुरुजींनी यशस्वीपणे साध्य केले आहे.

स्तोत्राचे वैशिष्ट्य सांगताना श्री. बापट गुरुजी सांगतात,'तत्त्वज्ञानाचा हा भाग थोडासा क्लिष्ट वाटला तरी, जसा गालिचा उलगडत जातो, तसेच हे स्तोत्र भक्तीची कास धरून ज्ञानमार्ग आपल्यापुढे उलगडत नेईल. (पृ.१५) तर विवेचनाच्या ओघात अन्य आध्यात्मिक सांकेतिकांचेही विवरण करतात. (पृ.७०) 'खऱ्या भक्ताला काहीही स्वार्थ नसतो. त्याला एकच दृष्टी असते आणि योग्य ज्ञान असतं की, सद्गुरुचरण किंवा ब्रह्मतत्त्व, दत्ततत्त्व जे आहे, ते आणि मी एकच आहोत. फक्त ते समजण्यासाठी ह्या चरणांची, ह्या पादुकांची सेवा आपल्याला करायची आहे. या निरपेक्ष भावालाच 'अकुसीद वृत्ती' असं म्हटलं आहे....'(पृ.९८)...'पुढे प्रभूच्या स्वरूपाचे वर्णन 'तत्स्थ' या शद्वात केले आहे. 'तत्स्थ' म्हणजे,'तत्' मध्ये स्थित असलेला. वेदांच्या चार महावाक्यांपैकी महत्त्वाचे म्हणजे 'तत् त्वम् असि'-तेच तू आहेस! येथे 'तत्' अथवा 'ते' शद्वाच्या लक्ष्यार्थाने ब्रह्मतत्त्व सूचित होते. या 'तत्' म्हणजे ब्रह्मतत्त्वाच्या जाणिवेमध्ये सदैव स्थित असणारे, ते 'तत्स्थ' असं सद्गुरुतत्त्वाचं, दत्तात्रयांचं, आत्मतत्त्वाचं खरं स्वरूप आहे.' असे श्री. गुरुजींनी विषयाचे मार्मिक विवेचन व विश्लेषण केले आहे.

तसेच सदर ग्रंथाच्या विवेचनातील वास्तवता, वैशिष्ट्य व वैचारिक सामर्थ्य यांचा प्रत्यय लेखनाच्या ओघात करताना गुरुचरित्र, दासबोध, श्री शंकराचार्यांची ग्रंथसंपदा, श्री दत्तमाहात्म्य, भगवद्गीता, योगसूत्र, इत्यादी अनेक ग्रंथातील अवतरणं पाहून श्री. गुरुजींचा व्यासंग आणि विषयाचे मर्म जाणण्यातील अधिकार पटतो. केवळ नुसती अवतरणंच दिलेली नसून प्रसंगी ऐतिहासिक, पौराणिक कथांद्वारे विषय अधिक सोपा व सुलभ केला आहे. प.प.वासुदेवानंद सरस्वती यांच्या गूढ अशा लेखनाचे मर्म श्री. बापट गुरुजी यांनी जाणलं तर आहेच पण ते आत्मसातही केले आहे हे प्रत्येक श्लोकाच्या विश्लेषणातून जाणवतं. अन् म्हणूनच हे शिवधनुष्य त्यांनी समर्थपणे पेलले आहे, आपला आध्यात्मिक अधिकार प्रत्ययास आणून दिला आहे असे म्हणणे योग्य ठरते.

साधनामार्गाच्या वाटेवर नव्याने प्रवेश करणारे किंवा आध्यात्मिक क्षेत्रातील उन्नतीचा मार्ग अनुसरणारे तसेच ज्यांना प्रार्थना, उपासना, साधना, इत्यादींबाबत कुतुहल, औत्सुक्य असेल त्यांनी त्याचप्रमाणे सहज ज्ञान संवर्धनाच्या लालसेने परंतु अंतर्गत हेतु वेगळाच असलेल्यांनी देखील हा ग्रंथ संग्रही ठेवण्याबरोबर खरोखरीच वाचावा. मनातील शंकांची अनेक कोळिष्टकं स्वच्छ होऊन 'उपासनेला दृढ चालवावे' या निर्णयापर्यंत यावयास प्रवृत्त होतील. भाषा सोपी, प्रवाही व प्रासादिक असून कोठेही क्लिष्टता अथवा पाल्हाळ जाणवत नाही. अत्यंत साक्षेपाने विषय समजावून सांगताना या सारस्वत मंदाकिनीच्या वैचारिक झुळझुळीत मनसोक्त डुंबण्याचा, अननुभूत विचारमोती गवसण्याचा आनंद लाभतो. श्री. बापट गुरुजींचे हे कार्य निश्चितच स्पृहणीय आणि अनमोल असे मानायलाच पाहिजे.

◆◆◆